


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## अण्वस्त्रांची धमकी देणाऱ्या पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांचे तोंड भारताने केले बंद; एक्स अकाउंटवर घातली बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ नागरिकांची हत्या केल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या हल्ल्यानंतर भारताने शेजारील देश पाकिस्तानबाबत आक्रमक भूमिका घेत कठोर पावले उचलली आहेत. सिंधू जल करार स्थगित करण्यासह पाच महत्त्वाचे निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानने भारताला इशारा दिला होता. अनेक पाकिस्तानी नेत्यांनी भारताला धमकावलं होतं. त्यानंतर आता भारताला इशारा देणाऱ्या पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांची बोलती बंद करण्यात आली आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने मंगळवारी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांचे एक्स (पूर्वीचे ट्विटर) अकाउंट ब्लॉक केले. पहलगाम हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, त्यातील बहुतेक पर्यटक होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ हे सतत



भारताविरुद्ध गरळ ओकत आहेत. भारताला त्यांनी अणुहल्ल्याची धमकी देखील दिली होती. त्यानंतर आता पाकिस्तानी संरक्षणमंत्र्यांना भारतात गप्प करण्यात आले आहे.


एका मुलाखतीत, आसिफ यांना पाकिस्तानने दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्याचा, प्रशिक्षण देण्याचा आणि निधी देण्याचे काम केले आहे का असं विचारलं. त्यावेळी मंत्री ख्वाजा आसिफ यांनी हे मान्य केले आहे. आम्ही जवळजवळ तीन दशकांपासून अमेरिका आणि ब्रिटनसह पश्चिमेसाठी हे घाणेरडे काम करत आहोत, असे आसिफ म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावरुन पाकिस्तानला कोंडीत पकडताना भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये हा मुद्दा उपस्थित केला. संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या उप-स्थायी प्रतिनिधी राजदूत योजना पटेल यांनी दहशतवादाला प्रोत्साहन देण्यात पाकिस्तानच्या सहभाग असल्याचे म्हटलं.

यापूर्वी, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी धमकी दिली होती की, पाकिस्तान पूर्णपणे सतर्क आहे आणि आपल्या अस्तित्वाला थेट धोका असल्यास आमचा देश अण्वस्त्रांचा वापर करेल. याआधीही अनेक वेळा पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी भारताविरुद्ध द्वेषपूर्ण विधाने केली आहेत.

## पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठीचा प्लॅन तयार पंतप्रधान मोदी उद्याला घेणार चार बैठका त्यानंतर....

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नवी दिल्ली**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला आज आठवडा उलटला आहे. या घटनेनंतर देशभरातून संतापाची लाट व्यक्त होत आहे. तसेच दहशतवादी आणि त्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचा निर्धार केला आहे. स्वत: मोदी सुरक्षा दलांकडून याबाबत खडानखडा माहिती मिळवत आहेत.



तसेच आता पुढे काय कारवाई करायची याची आखणी करण्यासाठी केंद्र सरकार बुधवारी महत्त्वपूर्ण बैठका घेणार आहे. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी एकापाठोपाठ एक चार बैठका घेणार असून, त्यात काही मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बुधवारचा दिवस निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. बुधवारी सकाळी ११ वाजता सर्वप्रथम कॅबिनेट सुरक्षा समितीची बैठक बोलावण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. या बैठकीत संरक्षणविषयक तयारीवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पहलगाममधील हल्ल्यानंतर आठवडाभरात दुसऱ्यांदा या समितीची बैठक होणार आहे.

या बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली सीसीपीएची बैठक होईल. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, वित्तमंत्री निर्मला सीतारमन, केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी, सर्वानंत सोनोवाल आदी मंत्री सहभागी होतील.त्यानंतर बुधवारी होणारी तिसरी मोठी बैठक ही कॅबिनेटच्या आर्थिक विषयक समितीची असेल. त्यानंतर कॅबिनेटची बैठक होईल. पहलगाममधील हल्ल्यानंतर होणारी ही कॅबिनेटची पहिलीची बैठक असेल. या बैठकीत संरक्षण विषयक तयारीचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर इतर विषयांवर चर्चा होईल. त्यानंतर पुढील रणनीतीबाबत काही मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.

## कारगिलमध्ये हरवलं होतं, जरा डोकं लावा...; धवनने आफ्रिदीला सुनावले; अपमानाची करुन दिली आठवण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला आहे. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे समोर येत आहे. मात्र पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदी हे मान्य करायला तयार नाही. शाहिद आफ्रिदीने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचे पुरावे भारताकडून मागितले होते. तसेच या हल्ल्यासाठी भारतीय सैन्यालाही जबाबदार धरलं. यावरुनच भारतीय क्रिकेकटपटू शिखर धवनने आफ्रिदीला सुनावलं आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत केलेल्या विधानामुळे पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीवर सर्व बाजूंनी टीका होत आहे. भारतीय सैन्यावर अपमानास्पद टिप्पणी करणाऱ्या शाहिद आफ्रिदीला शिखर धवनने चोख प्रत्युत्तर दिले आहे. माजी भारतीय क्रिकेटपटूने सोशल मीडियावर पाकिस्तानचा माजी कर्णधार



शाहिद आफ्रिदीवर टीका केली. तुम्ही अजून किती खालच्या पातळीवर जाणार आहात असं शिखर धवनने म्हटलं आहे.तुम्हाला कारगिलमध्ये सुद्धा हरवलं होतं. आधीच तुम्ही इतके खालच्या पातळीवर गेला आहात, आणखी किती खाली जाल? अनावश्यक टिप्पण्या करण्याऐवजी, तुमच्या देशाच्या प्रगतीसाठी डोकं लावा. शाहिद आफ्रिदी आम्हाला आमच्या भारतीय सैन्याचा खूप अभिमान आहे. भारत माता की जय! जय हिंद!, असं शिखर धवन याने म्हटलं आहे.

## पाकिस्तानकडून सायबर 'वार', भारतीय लष्कराची वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९जम्मू**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला आहे. पाकिस्तानने भारतावर सायबर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानी हॅकर्सनी भारतीय लष्कराचं संकेतस्थळ हॅक करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय लष्कर आपल्याविरोधात आक्रमक कारवाई करू शकते, या भीतीमुळे गाळण उडालेल्या पाकिस्तानकडून सायबर हल्ले सुरू झाले आहेत. पाकिस्तानने भारतीय लष्कराची वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न केला आहे. पाकिस्तानने मागच्या दोन दिवसांत दोन वेळा भारतीय लष्कराच्या वेबसाईटवर सायबर हल्ला करून वेबसाईट हॅक करण्याचा प्रयत्न केला. मात्र भारताच्या टेक तज्ज्ञांनी हे हल्ले हाणून पाडले आहेत.

## पुण्यातून ३ पाकिस्तानी नागरिकांना दाखवला घरचा रस्ता केंद्र सरकारच्या आदेशानंतर कोंढवा परिसरात कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पुणे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकार ऍक्शन मोडवर आले आहे. केंद्र सरकारच्या आदेशानंतर मुख्यमनातरी देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा कडक कारवाई कारण्याचे निर्देश दिले आहेत. अशातच पुण्यातून तीन पाकिस्तानी नागरिकांना घरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. कोंढवा परिसरात वास्तव्यास असलेले हे तीन जण 'शॉर्ट टर्म व्हिसा'वर भारतात आले होते आणि आपल्या नातेवाईकांकडे वास्तव्यास होते. ही कारवाई पुणे पोलिसांच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी गोळीबाराची घटना घडली. या




हल्ल्यात २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. यानंतर देशातील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, संरक्षणविषयक केंद्रीय समितीच्या (CCS) बैठकीत सार्क व्हिसावर भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील पाकिस्तानी नागरिकांवर कारवाई करत त्यांना परत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासनाकडून यासंदर्भात अधिक तपशील देण्यात आलेला नाही, मात्र ही कारवाई सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. ही घटना भारत-पाकिस्तान दरम्यानच्या सद्यस्थितीतील तणाव आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा भाग असल्याचे बोलले जात आहे.

## पहलगाम हल्ल्यात मरण पावलेल्या संतोष जगदाळेंच्या कन्येला शासकीय नोकरी मिळणार, राज्य सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मुंबई**

कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या महाराष्ट्रातील सहा जणांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारने ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. यासह पीडित कुटुंबांमधील सदस्यांच्या शिक्षणाची व नोकरीची जबाबदारी राज्य सरकार घेणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतची घोषणा केली आहे.

दरम्यान, या हल्ल्यात



मृत्यूमुखी पडलेल्या पुण्यातील संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे हिला शासकीय नोकरी दिली जाणार असल्याचं आश्वासन राज्य सरकारने दिलं आहे. आसावरीने माध्यमांसमोर याबाबतची माहिती दिली.आसावरी म्हणाली, राज्य सरकार पीडित कुटुंबांसाठी जे काही करतंय त्याबद्दल मी मुख्यमंत्री व इतर सर्व शासकीय लोकांचे मनापासून आभार मानते. त्या सर्वांनी आम्हाला सांगितलं आहे की ते आमच्याबरोबर आहेत. या कठीण काळात आमच्या कुटुंबांबरोबर आहेत. सरकारमधील प्रत्येकजण आम्हाला मदत करेल. राज्य सरकारकडून सांगण्यात आलं होतं की तुमच्या शासकीय नोकरीसाठी आम्ही प्रयत्न करू. आम्हाला आर्थिक मदत व मला शासकीय नोकरीचं आश्वासन देण्यात आलं आहे. त्याबद्दल मी शासनाचे व मुख्यमंत्र्यांचे आभार मानते.

**काश्मीरमधली ५० पर्यटन स्थळं बंद, जम्मू काश्मीर सरकारचा निर्णय**

जम्मू काश्मीर सरकारने पहलगाम हल्ल्याच्या सातव्या दिवशी मोठा निर्णय घेतला आहे. काश्मीरमधली ५० ठिकाणं ही पर्यटकांसाठी बंद करण्यात आली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतला आहे. पुरेशी सुरक्षा नसल्याने ही पर्यटनाची ठिकाणं बंद करण्यात आली आहेत. या ठिकाणांमध्ये वेरीनाग, बंगस खोरं, युसमार्ग रिसोर्ट यांचा समावेश आहे. ज्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था चोख आहे अशी ठिकाणी खुली राहतील असं सरकारने म्हटलं आहे.

## पहलगाम हल्ल्याची धग इस्लामाबाद ते कराचीपर्यंत; पाकिस्तानला ७० हजार कोटींचे नुकसान, आर्थिक अस्थिरतेकडे वाटचाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या निर्णायक भूमिकेमुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था मोठ्या संकटात सापडली आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली आहे. अवघ्या काही दिवसांत पाकिस्तानच्या शेअर बाजाराला सुमारे ७० हजार कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे.

पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा बळी गेला. या घटनेनंतर भारत सरकारने पाकिस्तानविरोधात विविध पातळ्यांवर कठोर पावलं उचलली आहेत. द्विपक्षीय व्यापार थांबवणे, सिंधू पाणी वाटप करार निलंबित करणे, सार्क वीजा सवलतीचा लाभ रद्द करणे, पाकिस्तानी लष्करी सल्लागारांना देश सोडण्याचे आदेश आणि अटारी वाघा सीमेवरील वाहतूक थांबवणे असे निर्णय भारताने घेतले.

**पाकिस्तानचा शेअर बाजार सातत्याने घसरला**

भारताच्या या निर्णयांचा धक्का मात्र पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला बसल्याचं दिसून आलं. यामुळे कराची स्टॉक एक्सचेंजच्या KSE-100 निर्देशांकात सलग घसरण होत आहे. सोमवार, २२ एप्रिल रोजी निर्देशांक १,४०५ अंकांनी घसरला. तर मंगळवारीही




१,१०० अंकांची घसरण नोंदवली गेली. २४ एप्रिल रोजी बाजार सुरु झाल्यानंतर काही मिनिटांतच निर्देशांकात २,४८५ अंकांची मोठी कोसळ झाली. दिवसअखेर तो २,२०६ अंकांनी घसरून १,१५,०१९.८१ वर बंद झाला. २९ एप्रिलपर्यंत या निर्देशांकात एकूण ५,४९४ अंकांची घसरण झाली आहे.

या घसरणीचा थेट परिणाम बाजारमूल्यावर झाला असून, कराची शेअर बाजाराचे एकूण मूल्य ५२.८४ अब्ज डॉलर्सवरून ५०.३९ अब्ज डॉलर्सवर आले आहे. यामध्ये २.४५ अब्ज डॉलर्सचा तोटा म्हणजेच भारतीय चलनानुसार सुमारे ७०,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

**महागाईचा दर ३८.५ टक्क्यांवर**

शेअर बाजारातील या अस्थिरतेव्यतिरिक्त पाकिस्तान अनेक आर्थिक आव्हानांशी देखील झुंजत आहे. देशातील महागाई दर ३८.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, आर्थिक वृद्धीदरही नकारात्मक झोनमध्ये आहे. परकीय चलन साठा केवळ ३.७ अब्ज डॉलर्सवर आला असून आयातही अडचणीत आली आहे.

**राजधानी वाचवण्यासाठी पाकिस्तानची धावपळ**

राजधानी इस्लामाबाद वाचवण्यासाठी पाकिस्तानची धावपळ सुरु झाली आहे. भारत हवाई हल्ला करेल या भीतीनं पाकिस्ताननं इस्लामाबाद-लाहोर हवाईहद्द बंद केली आहे. तर पाकिस्तानी वायुदलाकडून नोटीस टू एअरमेन जारी करण्यात आलं आहे. त्यानुसार २८ ते ३० एप्रिल दरम्यान लाहोर ते इस्लामाबादवरून कोणत्याही देशाच्या नागरी विमानाला उड्डाणास बंदी करण्यात आली आहे. कोणत्याही देशाच्या लष्करी विमानांनाही लाहोर ते इस्लामाबाद उड्डाणबंदी असणार आहे.

## संपादकीय ......

# पुलवामा, पहलगाम ते पाकिस्तान

*२२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष वेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागांतून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असताना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २६ हिंदू पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या. काश्मीरचे स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. त्या दिवशी बैसरनमध्ये येऊन कोणी घोडेस्वारीचा आनंद घेत होते, कोणी खाण्यापिण्यात मस्त दंग होते, मुले खेळत होते, मस्ती करत होते, कोणी फोटो काढत होते, तर कोणी व्हीडिओ शूटिंगमध्ये निसर्गाचे सौंदर्य टिपत होते. अचानक गोळीबाराचे आवाज आले, पोलिसांच्या गणवेषात काही धावताना दिसले, पोलिसांबरोबर कुणाची तरी चकमक चालू आहे असे पर्यटकांना क्षणभर वाटले पण ते तरुण दहशतवादी हातात बंदूक घेऊन प्रत्येकाला नाव विचारायला लागले, तू हिंदू का मुस्लीम असा प्रश्न थेट विचारू लागले, कलाम पढायला सांगू लागले आणि एकापाठोपाठ एक अशा हिंदू पर्यटकांना डोक्यावर, छातीवर गोळ्या घालून ठार मारू लागले. पत्नी आणि मुलांसमोर त्यांनी पुरुष पर्यटकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता. त्या दिवशी पहलगाम परिसरात अडीच हजार पर्यटक होते. बैसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कोणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली, ज्या पर्यटकांविषयी संशय आला त्यांच्या अंगावरची पँट काढून खतना तपासला. खतना न केलेल्यांना त्यांनी जवळून गोळी घातली, जे गप्प बसले, तेही रक्ताच्या थारोळ्यात पडले.*

*पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशांतून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात. पहलगाम हे भारत-पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला आठ तास तरी लागतातच. अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तवाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करून आले असण्याची शक्यता आहे.*


*पण ते पहलगामला पोहोचून तेथे २६ हिंदू पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू-काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलालासुद्धा त्याचा थांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. जम्मू-काश्मीर हा देशातील सर्वात मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. चोवीस तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते. मग यावेळी आपण कमी कुठे पडलो ?*

*पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले? पहलगाममध्ये अडीच हजार पर्यटक असताना ज्या बैसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती. कुठेही पोलीस चौकी नव्हती. कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २६ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे. दहशतवादी निश्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार. ते काही बंदुका हातात घेऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर पाच दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही.*

*पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किंमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत (पहलगाममध्ये निरपराध २६ हिंदू पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय?) जम्मू-काश्मीर हा देशातील सर्वात मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. चोवीस तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते. मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?*

*पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एकदा दाखवावा लागेल पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्त्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार याची सारे जग वाट पाहत आहे. पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.*

# भगवान विष्णूंचा सहावा अवतार !




कलियुगात अजूनही ८ चिरंजीवी देवता आणि महान व्यक्तिमत्त्वे जिवंत असल्याचे मानले जाते. या ८ चिरंजीवींमध्ये भगवान विष्णूंनी भगवान परशुराम म्हणून सहावा अवतार घेतला. त्यामुळे अक्षय्य तृतीयेसोबतच परशुराम जयंतीही साजरी केली जाते. हिंदू पंचागानुसार भगवान परशुराम जयंती दरवर्षी वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला साजरी केली जाते. यावर्षी ही तारीख २९ एप्रिल रोजी साजरी केली जाईल. तृतीया तिथी २९ एप्रिल रोजी सुरू होईल आणि ३० एप्रिल रोजी दुपारी २१२ वाजता संपेल. प्रदोष काळात भगवान परशुराम यांचा अवतार झाला होता. म्हणून, यंदा परशुराम जयंती २९ एप्रिल रोजी साजरी केली जाते.भगवान परशुराम हे ब्राह्मण होते पण त्यांच्यात क्षत्रियाचे गुण होते. जमदग्नी ऋषीं आणि देवी रेणुका यांच्या पाच मुलांपैकी परशुराम हे चौथे होते. परशुराम हे शिवाचे परम भक्त होते. त्यांना भ्यायाची देवताही म्हटले जायचे. धार्मिक मान्यता आणि हिंदू धार्मिक ग्रंथांनुसार, भगवान विष्णूने पृथ्वीवरील राजाने केलेले अन्याय, अधर्म आणि पापी कृत्ये नष्ट करण्यासाठी परशुरामाच्या रूपात अवतार घेतला. हिंदू मान्यतेनुसार,भगवान परशुराम सात चिरंजीवी पुरुषांपैकी एक आहेत आणि कलियुगात आजही पृथ्वीवर आहेत. अशी मान्यता आहे.भगवान परशुरामाचे जन्माचे नाव राम होते. त्यांनी आपल्या कठोर तपश्चर्येने भगवान शिवाला प्रसन्न केले. त्यानंतर भगवान शिवाने त्यांना अनेक अस्त्रे आणि शस्त्रे दिली.ज्यात परशु हा देखील मुख्य शस्त्र आहे. त्यांनी परशु धारण केले, त्यानंतर त्यांना परशुराम म्हटले जाऊ लागले. परशुरामाशिवाय ते रामभद्र, भार्गव, नावांनी देखील ओळखले जातात.भगवान परशुरामांनी अनेकांना शिकवले आहे. त्यांच्या शिष्यांमध्ये भीष्म पितामह, द्रोणाचार्य आणि कर्ण यांसारखे योद्धे आहेत. भगवान शिव यांना प्रसन्न करण्यासाठी परशुरामानी तीव्र तपश्चर्या केली, त्यानंतर त्यांना वरदान म्हणून एक शक्तिशाली कुऱ्हाड देण्यात आली. या कुऱ्हाडीने परशुरामांनी विविध युद्धकलांमध्ये प्रभुत्व मिळवले. असे मानले जाते की परशुरामाची कुऱ्हाड आजही पृथ्वीवर अस्तित्वात आहे. भगवान शिव यांनी त्यांना अनेक दैवी शस्त्रे दिली, त्यापैकी एक 'परशु' नावाची अजिंक्य कुऱ्हाड होती. या कुऱ्हाडीने परशुरामांनी अधर्माचा नाश केला.




## आंबा खाल्ला की मुलांचं पोट बिघडतं, जुलाब होतात? पाहा मुलांना आंबा किती, कधी आणि कसा खायला द्यावा...

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळा म्हटलं की आपल्याला सगळ्यांतआधी आठवतो तो आंबा. आंब्याच्या सिझनला सुरुवात झाली की, आपण आपल्या रोजच्या डाएटमध्ये आंब्याचा समावेश करतो. आंबा हे फळं चवीला इतकं सुंदर गोड लागते की, कुणीही आंबा खाण्याचा मोह आवरु शकत नाही. आंबा घरातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्याच तितकाच आवडीचा. वर्षभर वाट पाहायला लावणाऱ्या या फळाचा सिझन सुरु झाल्यावर, आपण सगळेच अक्षरशः आंब्याबर तुटून पडतो. आंबा फक्त चवीलाच भारी लागतो असे नाही, तर तो खाणे आरोग्याच्यादृष्टीने देखील अतिशय फायदेशीर असते.



**लहान मुलांना आंबा खायला देण्यापूर्वी...**

आंब्यामध्ये नैसर्गिकरित्या फायटिक ॲसिडचे प्रमाण जास्त असते. हे आम्ल शरीरात जास्त उष्णता निर्माण करू शकते, ज्यामुळे लहान मुलांना जुलाब किंवा पोटदुखीची समस्या सतावू शकते. यासाठी, मुलांना आंबे खायला देण्यापूर्वी ते पाण्यात भिजवले पाहिजेत. आंबा कमीत कमी १ ते २ तास पाण्यात भिजवून ठेवल्याने त्यात असलेल्या फायटिक ॲसिडचे प्रमाण कमी होते. यामुळे आंबा खाल्ल्यानंतर शरीरात जास्त उष्णता निर्माण होणार नाही आणि बाळाला कोणत्याही आरोग्य आरोग्याच्या तक्रारी सहन न करता मनमुरादपणे आंब्याचा आस्वाद घेता येईल. घरातील लहान मुलांना आंबा देण्यापूर्वी चांगले पिकलेले, गोड आणि तंतुमय आंब्यांची निवड करावी. आंबा खाण्यापूर्वी कमीत कमी १ ते २ तास पाण्यात भिजत ठेवा. नंतर आंबा धुवून सोलून घ्या आणि त्याचा गर काढा. बाळ जर लहान असेल ६ महिन्यांच्या पुढील असेल किंवा दात आले नसतील तर आंबा चांगला मॅश करा किंवा प्युरी करून खायला द्या. मग हळूहळू जेव्हा मूल चांगले चावू लागते, तेव्हा तुम्ही त्याला लहान तुकडे देखील करून देऊ शकता. घरातील लहान मुलांनाच नाही तर आपण देखील आंबा खाण्यापूर्वी तो १ ते २ तास पाण्यात भिजत ठेवून मगच खावा, म्हणजे आंबा पोटाला बाधत नाही.

**लहान बाळांना आंबे कधी खायला द्यावेत ?**

लहान बाळांना आंबे देण्याचे योग्य वय ८ ते ९ महिन्यांनंतर आहे. यावेळी, बाळे हळूहळू सॉलिड पदार्थ खायला लागतात आणि फळांची प्युरी किंवा लहान तुकडे चघळायला लागतात, यावेळी तुम्ही तुमच्या बाळाला आंबा खायला देऊ शकता. सुरुवातीला, नेहमी पिकलेले गोड आंब्यांची निवड करा आणि ते चांगले मॅश करून खायला द्या जेणेकरून बाळ ते सहज खाऊ आणि पचवू शकेल.

# शेतजमिनीवर गाळ कसा पसरवायचा? त्याच्या पद्धती कोणत्या? जाणून घ्या सविस्तर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

शेतजमिनीवर गाळ व्यवस्थित पसरवला तर जमिनीचे आरोग्य सुधारण्यास आणि पीक उत्पादन वाढविण्यास मदत करते. गाळ ही एक बारीक मातीच्या कणांची सामग्री आहे, जी पोषक आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध आहे, ज्यामुळे मातीची उत्कृष्ट गुणवत्ता सुधारते.

शेतजमिनीवर एकसमान गाळ कसा पसरवायचा? गाळ पसरवण्याच्या विविध मशिनरी व पद्धती कोणत्या? याविषयी विस्तृतपणे माहिती पाहूयात.

### शेतजमिनीवर गाळ कसा पसरवायचा?

शेतजमिनीवर गाळ पसरविण्याची पहिली पायरी म्हणजे जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन कार्यक्रम मागणी-आधारित प्रक्रियेद्वारे जलसाठ्यातून गाळ काढणे.

एकदा का तुम्ही गाळ मिळवला की, पुढची पायरी म्हणजे ती शेतजमिनीत नेणे. शेतजमिनीवर गाळ पसरविण्यासाठी, तुम्हाला स्प्रेडर किंवा लोडर वापरावे लागेल.

जर तुम्ही स्प्रेडर वापरत असाल, तर ते गाळाच्या सामग्रीने भरा आणि ते ट्रॅक्टर किंवा इतर उपकरणांना जोडा. त्यानंतर, स्प्रेडरला संपूर्ण शेतजमिनीवर चालवा, जमिनीवर समान रीतीने गाळाचे वितरण करा.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

जर तुम्ही लोडर वापरत असाल, तर गाळाची सामग्री फक्त स्कूप करा आणि नियंत्रित पद्धतीने शेतजमिनीवर जमा करा, ते जमिनीच्या पृष्ठभागावर समान रीतीने वितरित केले जाईल, याची खात्री करा.

### गाळ पसरवण्याच्या विविध मशिनरी व पद्धती

शेतजमिनीवर गाळ पसरविण्यासाठी अनेक पद्धती वापरल्या जाऊ शकतात. सर्वात सामान्य पद्धतींमध्ये खालील पद्धती समविष्ट आहेत.

**१) स्प्रेडर**

स्प्रेडर हे एक मशीन आहे, जे ट्रॅक्टर किंवा इतर उपकरणांना जोडले जाऊ शकते. स्प्रेडर मातीच्या पृष्ठभागावर गाळाची सामग्री समान रीतीने वितरीत करतो.

**२) लोडर**

लोडर हे एक यंत्र आहे, ज्याचा वापर गाळ काढण्यासाठी आणि नियंत्रित पद्धतीने शेतजमिनीवर जमा करण्यासाठी केला जाऊ शकतो.

ब्लोअर

३) ब्लोअर हे एक मशीन आहे, जे संकुचित हवेचा वापर मोठ्या क्षेत्रावर गाळ सामग्री वितरीत करण्यासाठी करते. ही पद्धत मोठ्या शेतांसाठी सर्वात योग्य आहे.

**४) स्प्रेअर**

स्प्रेअर हे एक मशीन आहे, ज्याचा वापर मातीच्या पृष्ठभागावर गाळ टाकण्यासाठी केला जाऊ शकतो. ही पद्धत लहान शेतांसाठी सर्वात योग्य आहे.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

### गाळ एकसमान पसरविण्याचे महत्त्व

प्रथम, हे सुनिश्चित करते की मातीला पोषक आणि सेंद्रिय पदार्थांचे सातत्यपूर्ण प्रमाण मिळते, जे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत करते आणि पीक उत्पादन वाढवते.

दुसरे, गाळ एकसमान पसरविणे हे शेतजमिनीच्या काही भागात गाळाचा जास्त वापर आणि इतर भागात कमी वापरास प्रतिबंध करण्यास मदत करते. हे मातीचे संकुचन आणि धूप रोखण्यास मदत करते, ज्यामुळे मातीच्या आरोग्यावर आणि पीक उत्पादनावर नकारात्मक परिणाम होतो.

तिसरे, गाळ एकसमान पसरविणे वारा किंवा पाण्याच्या धूपामुळे वाया जाणारे किंवा नष्ट होणारे गाळाचे प्रमाण कमी करण्यास मदत करते. हे सुनिश्चित करते की, मातीचे आरोग्य आणि पीक उत्पादन सुधारण्यासाठी गाळाचा प्रभावी आणि कार्यक्षमतेने वापर केला जातो.

# सेवा हक्क दिनानिमित्त 'सेवा पंधरवडा'

## नागरिकांनी सेवा पंधरवडा प्रलंबित सेवा प्राप्त करून घ्या -आयुक्त नरुकुल्ला रामबाबू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती,**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा २०१५ च्या अमलाच्या दहा वर्षांच्या निकालाच्या निकालाच्या आज, २८ एप्रिल रोजी राज्यभर 'सेवा हक्क दिन' सुरू करण्यात आला असून याद्वारे आजपासून ते १२ २०२५ पर्यंत 'सेवा पंधरवडा' उपक्रम सुरू आहे. नागरिकांनी या 'सेवा पंरव'चा लाभ उठवला आहे.

सेवा हक्क दिनाच्या औचित्यावर विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. मंत्रालयात आयोजित एका विशेष समारंभात मुख्यमंत्री महोदयांच्या लाभार्थी लोकसेवा कार्यक्रमात उत्कृष्ट काम केल्याबद्दल जिल्ह्याचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे, जिल्हा स्तरावर देखील आपल्याला मिळालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमांना संबंधित पालकांचे पालक, सन्माननीय लोकनिधी, स्वयंसेवी संस्थांचे सदस्य आणि नागरिक मोठ्याने उपस्थित होते. यासह ग्रामपंचायतीमध्ये विशेष कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमाच्या दरम्यान महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिकाराचे प्रमुख वैशिष्ट्य वाचन करण्यात आले. सेवा हक्क दिनाचे महत्त्व लक्षात ठेवा, सर्व राज्य कार्यालय कार्यालय अधिकारी आणि कर्मचारी यांना सेवेची शपथ देण्यात आली.

थेट आज सुरू झालेल्या 'सेवा पंढरव' दरम्यान, प्रशासनाकडून नागरिकांच्या प्रश्नावर विविध सेवांवर कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले. सेवा हक्क दिनाच्या स्वास्थ्यातून राज्याच्या सेवा हक्कता अमरावतीमावती अकोला तसेच आपल्या जिल्हाला प्रसाराची विशेष अधिकारी, आपल्या १० अमरावती आकाशवाणी आणि अलावाणी केंद्रातून आली. या आणि बँकीमध्ये आदरणीय तरतुदी त्याच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती दिली जाते. या 'सेवा पंधरव'चा लाभ घेणारे आणि आपल्या प्रलंबित सेवा त्वरित प्राप्त करून आडवाड्याचे विरोधक विरोध सर्व लोक केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण


# १७०० जन्म दाखले ताब्यात घ्या

## किरीट सोमय्या यांची महापालिका आयुक्तांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२९अमरावती**

महापालिका क्षेत्रात जन्म दाखले देण्याचे अधिकार तहसीलदारांना असताना त्याऐवजी नायब तहसीलदारांनी त्या अधिकारांचा वापर करून नागरिकांना जन्म मृत्यू दाखले दिले. मनपा प्रशासनाने ते दाखले रद्द करण्याचे आदेश फेब्रुवारीत निर्गमित केले, केवळ आदेश देऊन नव्हे तर देण्यात आलेले सर्व दाखले नागरिकांकडून ताब्यात घ्या, जेणेकरून त्याचा दुरुपयोग होणार नाही. अशा सूचना माजी खासदार किरीट सोमैय्या यांनी महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांना सोमवारी प्रत्यक्ष भेटून केली.किरीट सोमय्या सोमवारी अमरावती विदर्भ दौऱ्यावर होते. यवतमाळ, अकोलानंतर त्यांनी अमरावतीला भेट दिली. यावेळी त्यांनी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांची भेट घेतली. या चर्चेदरम्यान मनपा





आयुक्तांनी सांगितले की. मनपा प्रशासनाने १७०० जन्म मृत्यूचे दाखल रद्द करण्याचे आदेश दिलेले आहेत. ते दाखले रद्द झालेले असून नागरिकांनी त्याचा वापर करू नये, असे आदेशसुद्धा देण्यात आले आहे. त्यावर किरीट सोमय्या यांनी ते जन्म मृत्यूचे दाखले केवळ रद्दच नव्हे तर संबंधित नागरिकांकडून ताब्यात घेण्यात यावे, जेणेकरून नागरिक मनपा प्रशासनाच्या नकळत त्याचा फायदा घेणार नाही. त्यावर मनपा आयुक्तांनीसुद्धा संबंधित अधिकाऱ्यांना नागरिकांना ते जन्मदाखले महापालिकेत जमा करण्यात यावे, असे आवाहन करण्याचे निर्देश दिले.

अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बांगलादेशींना जन्म प्रमाणपत्र दिल्याचा आरोप किरीट सोमैय्या यांनी केला होता. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी व अमरावती महापालिका क्षेत्रात सर्वाधिक बांगलादेशी नागरिकांना हे प्रमाणपत्र देण्यात आल्याचा पुरावा देखील त्यांनी सादर केला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी सौरभकटियार यांनी समिती गठित करून चाचणी सुरू केली. त्यादरम्यान जन्म प्रमाणपत्र देण्याचे अधिकार तहसीलदारांना असताना ते अधिकार तहसीलदारांनी नायब तहसीलदारांना दिल्याने व त्यांनी मोठ्या प्रमाणात दाखले दिल्याने ते रद्द करण्यात आले आहेत. रद्द झालेल्या दाखल्यांमध्ये २३ ऑगस्ट २०२४ ते २१ जानेवारी २०२५ पर्यंतच्या दाखल्यांचा समावेश आहे.-

# किरीट सोमय्या यांनी घेतली पोलीस आयुक्तांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक,**
**दि२९अमरावती-** भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. २८) दुपारी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची भेट घेऊन गाडगेनगर पोलीस ठाण्यात दाखल जन्म-मृत्यू दाखले दिल्याप्रकरणात आतापर्यंतचा तपासाचा आढावा घेतला. तसेच यापुढे पोलिसांनी योग्यरित्या तपास करून आरोपींना अटक करण्याची मागणी केली. अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बनावट कागदपत्रांच्या आधारे तहसीलमधून जन्म-मृत्यू दाखले देण्यात आल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला होता. याच प्रकरणात सोमवारी किरीट सोमय्या शहरात आले होते. गाडगेनगर ठाण्यात दाखल असलेल्या प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी केलेल्या तपासाचा आढावा घेतला.यावेळी सोमय्या यांच्यासोबत चर्चेसाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, डिसीपी सागर पाटील, डिसीपी गणेश शिंदे उपस्थित होते. यावेळी बराच वेळ सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर त्यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, अमरावती शहर व ग्रामीण भागातील बनावट कागदपत्रांच्या आधारे सुमारे शंभर जणांनी बनावट कागदपत्रे जोडल्याचा पुरावा आम्ही यापुर्वीच प्रशासनाला दिला आहे. त्या आधा तपाससुध्दा सुरू आहे. आतापर्यंत पोलिसांन केलेल्या तपासाचा आढावा घेतला. यापुढ संबंधि तपास अधिकाऱ्याने योग्यरित्या तपास करून मुख आरोपींना अटक करण्याची मागणी पोलिस आयुक्तांकडे करण्यात आल्याचे सोमय्या यांनी माध्यमाना सांगितले.-

# स्व. सोमेश्वर पुसतकर स्मृती प्रित्यर्थ १ मे महाराष्ट्र दिनी भव्य रक्तदान शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती:-** स्थानिक आझाद हिंद मंडळ, बुधवारा अमरावती च्या वतीने मंडळाचे ज्येष्ठ सदस्य, शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख तथा विदर्भातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते स्व. सोमेश्वर पुसतकर यांचें स्मृती प्रित्यर्थ या वर्षी सुध्दा १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिना चे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन स्व.हरीभाऊ कालोती स्मारक येथे सकाळी ८.३० ते १२.३० वाजेपर्यंत करण्यात आले आहे.या प्रसंगी जास्तीत जास्त युवकांनी रक्तदान करावे असे आवाहन मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले माजी महापौर यांनी केले आहे.रक्तदान शिबिर ला मंडळाचे सर्व पदाधिकारी, शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर सदिच्छा भेट देतील.रक्तदान शिबिर चे यशस्वीते करीत अमरावती जिल्हा रक्तदान समिती चे श्री महेंद्र भुतडा, संदिप खेडकर, अजय दातेराव व त्यांची सर्व सहकारी, तसेच मंडळाचे सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.



# मोर्शी तालुक्याची खरीप हंगाम आढावा बैठक फळ पीक विम्याच्या मुद्द्यावर गाजली!

## गारपिट विम्यापासुन वंचित ठेवणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी-** मोर्शी येथील तहसील कार्यालयामध्ये मोर्शी विधासभा मतदार संघाचे आमदार उमेश यावलकर, तिवसा विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली मोर्शी तालुका स्तरीय खरीप २०२५-२६ हंगामपूर्व आढावा बैठकीचे आयोजन २८ एप्रिल रोजी तहसील कार्यालय मोर्शी येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी आढावा सभेमध्ये मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी हवामानावर आधारित संत्रा फळ पीक विम्याची पोल खोल केल्यामुळे संबंधित यंत्रणेची तारांबळ उडल्याचे चित्र पाहायला मिळाले. रुपेश वाळके यांच्या सह अन्य संत्रा उत्पादक शेतकऱ्यां नी २०२४ - २०२५ करीता गारपीट विमा मोर्शी येथील भारतीय स्टेट बँक शाखा मोर्शी येथून नोव्हेंबर २०२४ मध्ये काढला असून त्याची प्रीमियम रक्कम त्यांच्या खात्यातून डेबिट केल्या गेली. नोव्हेंबर महिन्यापासून काढण्या त आलेल्या विम्याची दखल विमा कंपनीने घेतली नसल्या मुळे विमा कंपनीच्या व बँकांच्या चुकीच्या धोरणामुळे संत्रा उत्पादक शेतकरी मदती पासून वंचित राहत असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विमा कंपनी व बँकेवर गुन्हे दाखल करण्याचा मुद्दा सभेमध्ये रेटून धरला असून १५ दिवसामध्ये न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी प्रशासनाला देण्यात आला. शेतक-यांना हवामाना चा अचूक अंदाज मिळावा व वातावरणातील बदलामुळे होणारे शेतीचे संभाव्य नुकसान टाळता यावे, या उद्देशाने शासनाच्या वतीने स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने मोर्शी तालुक्यातील हिवरखेड महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र सुरू करण्यात आले आहे. परंतु हिवरखेड मंडळातील स्वयंचलीत हवामान केंद्र मंडळाच्या मध्यभागी दापोरी येथे न बसविता मोर्शी तालुक्यातील अखेरच्या टोकाला बसविल्यामुळे नुकसान भरपाईचे ट्रिगर लागत नसल्यामुळे हिवरखेड मंडळातील फळ पीक विमा काढलेल्या हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदतीपासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केली असता आमदार उमेश यावलकर आमदार राजेश वानखडे यांनी या गंभीर प्रकारची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.

### हवामान केंद्र स्थलांतरित करण्याची दखल घेणार कधी ?

मोर्शी तालुक्यातील मंडळ कार्यालयांतर्गत उभारलेल्या हवामान केंद्र चुकीच्या ठिकाणी बसविण्यात आलेले असून हवामान केंद्रांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झुडपे वाढली असल्यामुळे हवामानाची अचूक नोंद होणार कशी? याबाबत संभ्रम निर्माण झाला असून या गंभीर प्रकारामुळे फळ पीक विमा धारक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून आम्ही जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा हवामान केंद्र स्थलांतरित करण्याची मागणी केली असता त्याची दाखल कोणीही घ्यायला तयार नसल्यामुळे विमा कंपनीचा कोट्यावधी रुपयांचा फायदा होत आहे व हजारो रुपये भरून विमा काढणारा शेतकरी कर्जबाजारी होतांना दिसत आहे.

**- रुपेश वाळके** उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोर्शी तालुका.



### स्वयंचलित हवामान केंद्र शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी की विमा कंपनीच्या फायद्यासाठी ?

# माता, नवजात बालकाच्या मृत्यूप्रकरणी चौकशी समिती स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मोर्शी अमरावती,**

नवजीवन हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी दाखल झालेल्या वर्षा दिपक कुटेमाटे ही गर्भवती महिला आणि नवजात बाळकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने चौकशी समिती स्थापन केली आहे.या चौकशी समितीमध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हेडाऊ - अध्यक्ष, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे - सहअध्यक्ष, तर सदस्य स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुषमा शेंद्रे, भिषक डॉ. प्रीती मोरे यांचा समावेश आहे. या समितीला प्रकरणाचा वस्तुनिष्ठ आणि विस्तृत अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहे.



# विदर्भ राज्य आंदोलन समितीतर्फे १ मे रोजी धरणे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-**

महाराष्ट्रदिन एक में विदर्भासाठीविश्वासघातकी काळा दिवस ठरला. विदर्भातील जनतेचे आपले वेगळे राज्य असावे, यासाठी विदर्भ राज्य आंदोलन समिती सतत लढा देत आहे, असे सांगत त्याचा एक भाग म्हणून १ मे महाराष्ट्र दिनी वेगळ्या विदर्भाच्या मागणी करिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ १ मे रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आणि याचंदिवसापासून संपन्न विदर्भ प्रदेशाची अक्षरशः लूट सुरु झाली. विदर्भातील खनिज, कोळसा, वीज, वनसंपदा, शेतमाल यांचे बेमालूमपणे शोषण सुरू झाले. गत पाच दशकात विदर्भाला अक्षरशः भिकार अवस्थेत आणून ठेवले, असे विदर्भ राज्य आंदोलन समितीने म्हटले आहे. या आंदोलनात विदर्भ राज्य महिला आघाडी अध्यक्षा रंजना मांगर्डे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. डॉ. पी. आर. राजपूत उपस्थित राहणार आहे. आंदोलनामध्ये विदर्भ प्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, शहराध्यक्ष रियाजखान , जिल्हा अध्यक्षा सुषमा मुळे, शहराध्यक्षा अनुष्काताई बेलौरकर , प्रकाश लड्डा, माधवराव गावडे. सुनील साबळे, सतीश प्रेमलवार, अफसरभाई, अशोक हांडे. डॉ. विजय कुबडे. बाबाराव जाधव, पांडुरंग बिजवे. प्रा. शरद पुसदकर, राजाभाऊ पुसदेकर, ज्ञानेश्वर डांगरकर प्रा. डॉ. राजेंद्र गडपायले, माजी पोलीस उप अधीक्षक कमलताई जाधव, रहमानभाई, अशोक राणे संजय हिंगे, साहेचराव इंगळे, दीपक शंभरकर, दिगंबर चुनडे, विनायक इंगोले, लक्ष्मणराव वानखडे, सत्यप्रकाश गुप्ता. दिवाकर राऊत, दिनेश डवस, प्रा. सुभाष धोटे, मनोज पोष्टानी, विजय मोहोड, अरुण साकुरे यांनी केले आहे.-




# चांदूर रेल्वेच्या महालक्ष्मी नगरात धाडसी चोरी

## ९४ ग्रॅमचे सोन्याचे दागिने केले लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदूर रेल्वे-** स्थानिक महालक्ष्मी नगर येथील रहिवासी रवींद्र साबळे यांच्या राहत्या घरी २७ एप्रिल रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरात शिरून तब्बल जवळपास ९४ ग्रॅमचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध २७ एप्रिलला दुपारी ३ वाजून ४४ मिनिटांनी बीएनएस कलम ३३१ (४), ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी रवींद्र साबळे हे बाहेरगावी गेले असता घरामध्ये पत्नी अपर्णा साबळे व त्यांची लहान मुलगी हे होते. घरात दोघीच असल्याने बेडरूम मध्ये न झोपता दोघीही हॉलमध्ये झोपल्या. अशातच मध्यरात्री २ वाजता दरम्यान कंपाउंड वाल वरून चोरट्यांनी प्रवेश करून बेड रूमचे लॉक तोडून बेडरूममध्ये प्रवेश केला व उर्वरित रूम आतून कडीने बंद केल्या.बेडरूममध्ये असलेल्या कपाटातील एक सोन्याचे मंगळसूत्र ३३ ग्रॅम किंमत अंदाजे ६६ हजार रुपये, मिनी मंगळसूत्र १५ ग्रॅम किंमत अंदाजे ३० हजार रुपये, अंगठी दहा ग्रॅम किंमत अंदाजे २० हजार रुपये, अंगठी पाच ग्रॅम किंमत अंदाजे दहा हजार रुपये, चांदीचे बिस्किट ३० ग्रॅम किंमत अंदाजे १८ हजार रुपये, सोन्याचा शिक्का १ ग्रॅम किंमत अंदाजे ४ हजार रुपये असा एकूण १ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज व एक मोबाईल किंमत अंदाजे ८ हजार रुपये असा एकूण १ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. सकाळी ७:३० वाजताच्या दरम्यान जेव्हा फिर्यादी अपर्णा साबळे ह्या झोपेतून जागी झाल्या तेव्हा हॉलच्या दाराची कडी बाहेरून बंद केल्याचे लक्षात आले. काहीतरी विपरीत घडल्यामुळे त्यांनी शेजाऱ्यांना आवाज दिला. त्यानंतर शेजाऱ्यांनी घरात येऊन हॉलला बाहेरून लावलेली कडी उघडली. बोळीतुन बेडरूममध्ये प्रवेश करताच चोरी झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ गाठले व प्राथमिक तपासकार्य केले आणि डॉग स्कॉड आणून पुढील तपास प्रारंभ केला. सदर प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे. या धाडसी चोरीमुळे याचा सुगावा लावण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे उभे झाले आहे.



**चोरी गेलेल्या दागिण्यांची किंमत बाजारभावात अधिक**

सदर चोरीत जवळपास ९४ ग्रॅमचे सोन्याचे दागिणे चोरट्यांनी लंपास केले. पोलीसांनी या दागिण्यांनी किंमत १ लाख ५८ हजार रुपये लावली असली तरी आजच्या बाजारभावानुसार ती किंमत अंदाजे ९ लाखांच्या जवळपास आहे. त्यामुळे शहरातील ही मोठी जबरी चोरी मानल्या जात आहे. त्यामुळे पोलीस याचा सुगावा लावण्यात यशस्वी होते का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.-

### चोरांचे प्रमाण वाढले, पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित

चांदूर रेल्वे शहरातील महालक्ष्मी नगर, संताबाई यादव नगर, महारुद्र नगर ह्या भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. दिवसाढवळ्याही या परिसरात चोय़ा होत आहे. तेव्हा पोलिसांनी या परिसरात गस्त वाढवून स्थानिक नागरिकांना संरक्षण देण्याची मागणी स्थानिक नागरिक करीत आहे. मात्र दिवसेंदिवस वाढत असलेले चोऱ्याचे प्रमाण वाहता पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# सीसीआयच्या कापूस खरेदीत शेतकऱ्यांचे शोषण!

## शेतकरी नेत्यांची प्रशासनाकडे तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९वरुड –** सन २०२४–२५ या वर्षाकरिता वरूड तालुक्यात सीसीआयमार्फत कापूस खरेदी करण्यात आली. त्यात शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण करण्यात आले. याला सर्वस्वी जबाबदार सीसीआयचे अधिकारी असून त्यामुळे शासनाचा कापूस खरेदी उद्देश सफल झाला नसून शेतकर्यांवर अन्याय झाला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून शेतकर्यांना न्याय मिळावा याकरिता शेतकरी नेत्यांनी भारतीय कापूस निगम अकोलाच महाप्रबंधक व सहकारी संस्था अमरावती जिल्हा उपप्रबंधक यांच्याकडे तक्रार केलेली आहे.

सीसीआयने वरूड तालुक्यात कापूस खरेदी करताना शेतकर्यांकडून मार्च, एप्रिल २०२५ मध्ये रुईचा उतारा नियमाप्रमाणे ३४.२५ किलो आवश्यक असताना, ढगा येथील पी. एन. व्हाईट गोल्ड जिनिंग येथे कापूस खरेदी केंद्रावर रुईचा उतारा शेतकर्याकडून प्रतिक्विंटल ३६ किलो घेण्यात आला. ज्या कापसाचा उतारा ३६ किलो नाही, तो सर्व कापूस परत करण्यात आला. या केंद्रावर शेतकर्याकडून प्रति क्विंटल २ किलो सूट बळजबरीने घेण्यात आली. शेतकर्यांना ब्लॅकमेल करून तुमचा कापूस चांगला नाही, तुम्हाला क्वालिटी डिडक्शन द्यावेच लागेल, अशी भाषा सीसीआयच्या अधिकार्यांनी वापरून शेतकर्यांकडून प्रतिक्विंटल २ किलोची सरासरी सूट घेतली.


या खरेदी केंद्रावर ९० हजार क्विंटल कापूस खरेदी झाला. यावरून आपल्याला लुटीचा आकडा काढता येईल. तसेच या केंद्रावर शेतकर्यांकडून कापूस गाडी मोजण्याचे पैसे घेतले आहे, ते नियमबाह्य आहे. ती रक्कम सुद्धा शेतकर्यांना परत करावी व न्याय द्यावा, तसेच दोषींवर कारवाई करावी, अन्यथा आम्ही शेतकरी जनआंदोलन छेडू, ती पाळी शेतकर्यांवर येऊ देऊ नये, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी शेतकरी नेते दिलीप भोयर , बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, भूमिपुत्र संघर्ष वाहिनीचे दीपक देशमुख, स्वप्निल खांडेकर, राहूल चौधरी, युवराज कराळे, अनिल वानखडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# दर्यापुरात आमदार, खासदार विरोधात रस्ता बांधकामासाठी जाहिरातबाजी

## रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात करा अन्यथा जन आंदोलनाचा इशारा !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ दर्यापूर –** दर्यापुरातील सामाजिक कार्यकर्ते ओम राणे यांनी अफलातून शक्कल लढवत खा. बळवंत वानखडे ,आ. गजानन लवटे यांचे संपूर्ण हिंगणी रस्त्याने जाहिरात फलक लावून त्यावर खासदार साहेब, आमदार साहेब बांधकामाचे काय झाले उत्तर द्या ? अशी विचारणा केली आहे. त्यामुळे हा सध्या शहरात हे जाहिरातीचे बॅनर्स चर्चेचा विषय बनले आहे. यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे.

शहरातील सर्वाधिक नागरिकांची वर्दळ असलेला मार्ग म्हणजे सांगळूदकर नगर – हिंगणी रस्ता असून या मार्गावरून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, शेतमजूर या घटकांना दररोज रस्त्यातील खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे. सदर परिसरातील नागरिक हे नियमितपणे आपल्या कराचा भरणा नगर परिषदेला करीत आहेत. परंतु, त्याच्या मोबदल्यात कोणतीही सेवा सुविधा मिळत नसल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली. त्यामुळे ओम राणे यांनी अफलातून फलकबाजी करत लोकप्रतिनिधींनी प्रश्न विचारले आहे. यामुळे शहरात एकच चर्चा रंगलेली बघायला मिळत आहे.



शहरातील सांगळुदकर नगर ,जागृती कॉलनी, पंजाबराव कॉलनी,अवधूत नगर ,शिक्षक कॉलनी,दत्त नगर,विहान मंगल कार्यालय परिसर, ड्रीमलँड सिटी व आणखी वाढत चाललेल्या परिसरात अद्यापही प्राथमिक सेवा सुविधा पाहिजे त्या प्रमाणात नगरपरिषद प्रशासनाने उपलब्ध करून दिल्या नाहीत. येथील सर्वच नागरिकांनी आपली तीव्र नाराजी आ. गजानन लवटे व खा. बळवंत वानखडे यांच्या विरोधात व्यक्त केली आहे. सदर रस्त्याची अनेक वृत्तपत्रात वस्तुस्थिती मांडण्यात आली होती.

अनेक वेळा सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित विभागाला व लोकप्रतिनिधींना निवेदने दिली. परंतु, याचा कोणताही फायदा झाला नाही. पावसाळा तोंडावर येत असून ठीक ठिकाणी पाणी साचत असते. त्या पाण्यात किड्याची निर्मिती होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. किडे व सरपटणारे प्राणी वेळप्रसंगी घरात प्रवेश करतात. त्यामुळे सुरक्षेचा मुद्दा आणखी गंभीर होत जातो. संबंधित लोकप्रतिनिधी व नगर परिषदेच्या बांधकाम विभागाने या अति महत्त्वाच्या रस्त्याच्या गंभीर समस्येकडे लक्ष केंद्रित करून रस्त्याचे ताबडतोब बांधकाम करावे .अन्यथा तीव्र जन आंदोलन व बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा ओम राणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे. तसेच त्यांनी या परिसरातील लोकांना जन आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन यावेळी ओम राणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिरजगाव येथील संत्रा व्यापाऱ्यांची ८.५६ लाखांनी फसवणूक

## १८.५३ लाखांचा संत्रा घेऊन उर्वरित रक्कम दिलीच नाही

### मुंबईच्या चार ठगबाजांविरोधात गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९शिरजगाव कसबा**
मुंबईच्या चार ठगबाजांनी जिल्ह्यातील शिरजगाव कसबा येथील संत्रा व्यापाऱ्याकडून १८ लाख ५३ हजार रूपयांचा संत्रा विकत घेतला. परंतु, आरोपींनी व्यवहारातील ८ लाख ५६ हजाराची रक्कम न देऊन व्यापाऱ्याची फसवणूक केली. याबाबत शिरजगाव कसबा पोलिसांनी मुंबईच्या चार ठगबाजआरोपींविरोधात गुन्हे दाखल केले आहे.

अशरफ जमिल खान (४२), शेख व असलम शेख हुसैन (४६), हुसैन शेख (६०), जाकीर खान (३५) सर्व रा. राव्हिजीटेबल ॲण्ड फ्रुट कमीशन एजंट, टाकर बाप्पा रोड, कुर्ला, ईस्ट, मुंबई अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. तर फसवणूक झालेल्या तक्रारदाराचे नाव असलम बेग मतीन बेग (२९) रा. मौलाना आझाद चौक, शिरजगाव कसबा असे आहे. माहितीनुसार, तक्रारकर्ते असलम बेग हे शिरजगाव कसबा येथील बडे संत्रा व्यापारी असून त्यांचे मौलाना आझाद चौकात कार्यालय आहे. वरील नमूद आरोपींनी ३० ऑगष्ट २०२४ रोजीअसलम बेग यांच्याकडून एकूण १८ लाख ५३ हजार ६८० रूपयांचा संत्रा बेग यांनी संपूर्ण माल मुंबईत आरोपींना पोहचून दिल्यानंतर आरोपींनी त्यांना केवळ ९ लाख ८८ हजार रूपये दिले. उर्वरित पैसे काही दिवसानंतर ऑनलाईन ट्रान्सपर करण्याचे आश्वासन आरोपींनी दिल्याने असलम बेग मुंबईहून परत आले. परंतु, आरोपींनी आजपर्यंत पैसेन दिल्याने तसेच त्यांचे मोबाइल नॉट रिचेबल असल्याने अखेर असलम बेग यांनी शिरजगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी चारही आरोपींविरोधात फसवणूकीचे गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# गुरुकुंजात राष्ट्रसंताच्या ग्रामजयंती महोत्सवास प्रारंभ

## सामुदायिक ध्यानातूनच दररोजच्या कामाची सकारात्मक ऊर्जा मिळते- लक्ष्मणदास गमे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९गुरुकुंज मोझरी–** सामुदायिक ध्यान हे एक आत्मशुद्धी केंद्र असून या ध्यानातून दररोजच्या कामाची ऊर्जा मिळते. संस्कारित मुले निर्माण करण्यासाठी देखील सामुदायिक ध्यान ही एक तत्वप्रणाली असून त्यात सर्वांनी सहभागी व्हावे व आत्मशुद्धी करावी, असे प्रतिपादन अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सर्वाधिकारी लक्ष्णदास गमे यांनी केले.

मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ११६ वा जन्मदिवस अर्थात ग्रामजयंती महोत्सवाच्या तिर्थस्थापणेप्रसंगी ते बोलत होते. सोमवारी २८ एप्रिल रोजी श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम (मोझरी) येथे राष्ट्रसंतांच्या महासमाधीस्थळी ग्रामजयंती महोत्सवाला प्रारंभ झाला. सर्वाधिकारी लक्ष्मणदास गमे व मालाताई गमे यांच्या हस्ते अभिषेक, पूजन करून तिर्थस्थापना करण्यात आली. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या संवादादरम्यान राष्ट्रसंतांचे



विचारधन मांडले गेले.

ते पुढे बोलताना म्हणाले, सामुदायिक ध्यान ही सर्वांचे कल्याण करणारी साधना आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्यासाठी ती मुद्दामहून निर्माण केली. त्यामुळे तिचा लाभ समस्त मानवजातीने घेतला पाहिजे. आपल्या संबोधनाच्या सेवटी गमे यांनी काही चिंतनही केले. प्रारंभी पहाटे ५ वाजता राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे अभिषेक, पूजन करण्यात आले. दरम्यान आगामी ३० एप्रिल रोजी सकाळी ६ ते ८ या वेळात पालख्यांची मिरवणूक व प्रतिमेची शोभायात्रा निघेल.ग्रामजयंती महोत्सवात मंगळवारी २९ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता सामुदायिक ध्यान व ग्रामगीताचार्य प्रा.अरविंद राठोड यांचे चिंतन होईल. सकाळी ६ वाजता ग्रामसफाई होईल. सकाळी ८ ते ९ या वेळात गुरुमाऊली महिला भजन मंडळ तर ९ ते १० या वेळात श्रीगुरुदेव महिला भजन मंडळ गुरुदेवनगर यांचा खंजेरी भजनाचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ७ ते ७.४५ या वेळात पुन्हा सामुदायिक प्रार्थना व महासमाधी औक्षण होईल. यावेळी संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई बोंडे या मार्गदर्शन करतील. रात्री ७.४५ ते ८.३० वाजता प्रा.जयश्रीताई सोनारे ह्या 'अवघा रंग भक्तीचा' हा कार्यक्रम सादर करतील. रात्री साडे ८ ते १० या वेळात आजीवन प्रचारक लक्ष्मणदास काळे महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होईल.

# विजय वडेट्टीवारांची त्या वक्तव्यावरुन 'माफी'

## वक्तव्य तोडून मोडून दाखवण्यात आल्याचा प्रसार माध्यमांवरच आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई–** काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरून त्यांच्यावर जोरदार टीका होत आहे. मात्र, यावर त्यांनी आता स्पष्टीकरण दिले आहे. माझे वक्तव्य तोडून मोडून दाखवण्यात आले असल्याचा आरोप त्यांनी प्रसार माध्यमांवरच केला आहे. अर्धवट दाखवण्याच्या भरवशावर देशात काहीतरी वेगळे वातावरण निर्माण करून काँग्रेसला अडचणीत आणण्याचे काम काही ठराविक माध्यमे करत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. आपल्या वक्तव्यावरून मी माफी मागत असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

या वेळी त्यांनी सर्व मीडियाला विनंती देखील केली. माझे भाषण पूर्ण दाखवा. अर्धवट दाखवू नका. सरकारचे अपयश लपवण्यासाठी काहीतरी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करू नका, अशी माझी स्पष्ट भूमिका असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. अतिरेक्यांनी पहिल्यांदाच



धर्म विचारला आहे. अतिरेक्यांना एवढा वेळ मिळाला यामध्ये त्यांना शिकवून पाठवले गेले आहे. देशातील दोन धर्मांमध्ये भांडण लावण्याचे काम करण्याचा आणि देश कमजोर करण्याचा हे काम पाकिस्तानचे होते, असे माझे मत असल्याचा देखील वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

### काय म्हणाले होते विजय वडेट्टीवार?

दहशतवादी हल्ला करताना लोकांशी बोलतात का? त्यांच्या धर्माची चौकशी करत बसतात का?. काही पर्यटक म्हणत आहेत की हल्लेखोरांनी धर्म विचारला, तर काहींचे म्हणणे आहे की असे काही घडलेच नाही, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले. त्यांच्या या विधानवरून त्यांच्यावर टीका केली जात आहे.

# मागील ५ वर्षांत १७४; तर यंदा ४ महिन्यांत रोखले ८ बालविवाह

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्हा प्रशासनाची राहणार करडी नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ यवतमाळ–** जागरूक नागरिकांच्या भक्कम पाठिंब्यामुळे जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत १७४ बालविवाह रोखण्यात महिला व बालविकास विभागाला यश आले. यातील ८ बालविवाह एप्रिल महिन्यापर्यंत रोखले आहेत. आता ३० एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गाव, तालुका व जिल्हा पातळीवर यंत्रणा अलर्ट करण्यात आली आहे. चाइल्ड हेल्पलाइन १०९८ व ११२ या टोल फ्री क्रमांकावर बालविवाहाची माहिती देण्याचे आवाहन बालविकास विभागाकडून केले आहे.ग्रामीण भागात ग्रामसेवक तर शहरात बालविकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनासाठी जनजागृती कार्यक्रम घेतले जात आहेत. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कायद्याची जाणीव व्हावी



तसेच कोणतेही बालक हक्कांपासून वंचित राहू नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे. कारवाईत गावपातळीपासून यंत्रणेची मदत घेतली जात आहे. २०२० १९ २०२१ ३२ (२ गुन्हे दाखल) २०२२ ३९ (३ गुन्हे दाखल) २०२३ २७ २०२४ ४८ (१ गुन्हा दाखल) २०२५ ०८ (२८ एप्रिलपर्यंत). पालकांकडून कारवाई करताना घेतले जाते हमीपत्र बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका, ग्राम पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. चाइल्ड लाइन तसेच महिला बालसंरक्षण समितीकडे कॉल आल्यानंतर मुलीच्या आईवडिलांचे समुपदेशन केले जाते. मुलीच्या पालकांकडून हमीपत्र लिहून घेतले जाते. काही मुलींना १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत बालगृहात ठेवण्यात येते, असे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी देवेंद्र राजुरकर यांनी सांगितले.

# विजेच्या वाढत्या मागणीमुळे महावितरणच्या यंत्रणेवर वाढला ताण

## दरदिवशी शहरातून वीजगुल झाल्याच्या येतात ३०० तक्रारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**
सद्या उन्हाचा पारा वाढला आहे, त्यामुळे पंखे, कुलर, एसीचा वापर प्रचंड वाढला आहे. उपकरणांचा वापर वाढल्यामुळे महावितरणच्या यंत्रणेवर चांगलाच ताण येतो आहे. त्याचा फटका शहरातील वीजग्राहकांना बसतो आहे. कारण शहरातील बहुतांश परिसरात सद्यास्थितीत दरदिवशी वीज पुरवठा खंडीत होत आहे. त्यामुळेच महावितरणकडे दरदिवशी शहरातून वीजगुल झाल्याच्या ३०० ते ३२० तक्रारी होत आहेत.

मागील दहा दिवसांपासून शहरात तापमान ४४ अंशाच्या वर गेले आहेत. त्यामुळे सकाळी दहा वाजतापासूनच वातावरण उष्ण राहायला सुरूवात होत आहे. त्यामुळे सकाळपासूनच कुलर, पंखे, एसी सुरू होतात. तशीच परिस्थिती सांयकाळच्यावेळी होते. दिवसभर कडाक्याचे ऊन राहते मात्र सांयकाळी ऊन नसतानाही उकाडा प्रचंड जाणवतो. त्या कारणाने दिवसापेक्षाही जास्त प्रमाणात वीज उपकरण सांयकाळी सुरू होतात. या ऊलट दिवसाच्यावेळी सोलर ऊर्जेव्दारे काहीसा ताण कमी होतो मात्र सांयकाळी सातनंतर तर पुर्णपणे वीजेवर अवलंबुन रहावे लागते. यातच रात्री आठ ते मध्यरात्री दोन या वेळेत वीजेची सर्वाधिक मागणी राहते. त्यामुळे नेमकी ज्यावेळी सर्वाधिक गरमी होते आणि सर्वसामान्यांची झोपेची वेळ राहते, त्याचवेळी दरदिवशी वीजगुल होते. असा अनुभव सद्यास्थितीत बहुतांश अमरावतीकरांना आहे. विशेष म्हणजे वीजगुल होण्याचा हा प्रकार एका दिवसाचा नसून दरदिवशीचाच आहे. वीजेची मागणी वाढल्यामुळे वारंवार वीज

### १६ मेगावॅटने मागणीत वाढ

पण पुरवठा तेव्हडा नाहीच शहरात मागील दहा दिवसाचा विचार केल्यास दरदिवशी सुमारे ६५ मेगावॅटची मागणी आहे. हीच मागणी मागील महिन्यात दरदिवशी ४८ ते ४९ मेगावॅटपर्यंत होती. वीजेची मागणी १६ मेगावॅटने वाढली असल्यामुळे वीजयंत्रणेवर अतिरिक्त ताण येतो आहे, हा ताण निवारण्यासाठी महावितरणकडून यंत्रणा अधिक सक्षम करण्यासोबतच अद्यायवत करणे आवश्यक झाले आहे.



पुरवठा खंडीत होत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात येते, वास्तविकता ही अडचण केवळ यंदाचीच नाही तर दरवर्षीचीच आहे. कारण महावितरणने उभी केलेली यंत्रणा अनेक वर्षांपुर्वीची आहे, त्यातुलनेत मात्र दरवर्षी नागरी वस्ती वाढत आहे मात्र महावितरणकडून अपेक्षित प्रमाणात त्यांच्या यंत्रणेत वाढ झालेली नाही. असे खासगीत महावितरणच्याच सूत्रांकडून माहीती मिळाली. यामुळे मात्र दरमहा हजारो रुपये वीज देयक भरणा करुनही अनेक ग्राहकांना खंडीत वीजसेवा मिळत आहे. याचवेळी तर अनेक भागात कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्यामुळे कुलर किंवा एसी अशी उपकरण घरी असूनही चालवणे शक्य होत नाही. त्यामुळेच सद्या महावितरणकडे शहरातून दरदिवशी ३०० ते ३२० ग्राहकांकडून वीजगुल किंवा कमी दाब असल्याच्या तक्रारी येत आहेत.

# तुकडोजी महाराजांच्या पावन भूमीतील जल व माती घेऊन महाराष्ट्र गौरव रथ यात्रेला प्रारंभ



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२९ गुरुकुंज मोझरी**

अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी मधून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वतीने महाराष्ट्र गौरव रथ यात्रेला प्रारंभ करण्यात आला.. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीला नतमस्तक होत याचा शुभारंभ करण्यात आला,यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार अमोल मिटकरी या सर्व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे त्यांच्या उपस्थितीमध्ये या यात्रेला सुरवात करण्यात आली, या कलश यात्रेमध्ये तुकडोजी महाराज त्यांच्या पावनभूमीतील माती व जल घेण्यात आले,तसेच संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील धर्मिक आणि ऐतिहासिक स्थळाची माती आणि जल यामध्ये घेण्यात येणार आहे,अजित पवार गटाच्या या महाराष्ट्र गौरव रथ यात्रेला अमरावती जिल्ह्यात उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून ठिकठिकाणी या यात्रेचा स्वागत करण्यात आलं.

# येत्या स्वातंत्र्य दिनापर्यंत शासनाच्या सर्वाधिक सेवा ऑनलाइन होणार : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

नागरिकांना लोकाभिमुख, पारदर्शी, तत्पर सेवा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ लागू केला. या अंतर्गत शासनाच्या ३३ विभागाच्या १,०२७ सेवा अधिसूचित केल्या आहेत. या सेवा विहित कालावधीमध्ये देणे बंधनकारक आहेत. यातील ५८३ सेवा ऑनलाइन असून, उर्वरित सेवा येत्या स्वातंत्र्य दिनापर्यंत ऑनलाइन



करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी करू, असे राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या शुभेच्छा संदेशाद्वारे कळविले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमनाच्या दशकपूर्तीनिमित्त सोमवारी नियोजन भवन येथे सेवा हक्क दिन आयोजित करण्यात आला होता. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास आमदार संजय मेश्राम, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रमेश धुमाळ, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे यांनी केले.शासकीय कार्यालयात दर्शनी भागात अधिसूचित सेवांचा तपशील, कालमर्यादा, शुल्क, अपिलीय अधिकारी आदी तपशील सूचना फलकांद्वारे लावणे अनिवार्य असल्याचे बावनकुळे यांनी संदेशात स्पष्ट केले. यावेळी शासकीय सेवेबाबत असलेल्या अधिकृत दरांची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यासाठी तयार करण्यात क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले.

# रोपे करपताहेत; 'क्रॉप कव्हर' वापरा अन् अनुदानही मिळवापिकांचे होईल संरक्षण: उन्हाच्या दाहकतेवर प्रभावी उपाययोजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

जिल्ह्यात उष्णतेची लाट आली आहे. यामुळे भाजीपाला पिकांसह फळपिकांना मोठचा प्रमाणात फटका बसत आहे. दरम्यान, अनेक शेतकरी या काळातही भाजीपाला लागवड करीत आहेत. भाजीपाला लागवड करत असताना, रोपांचे उष्णतेपासून



संरक्षण व्हावे, यासाठी 'क्रॉप कव्हर'चा वापर केला जात आहे. यासाठी शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान आणि कृषी विभागाकडून मार्गदर्शन मिळत आहे.

'क्रॉप कव्हर'च्या वापरामुळे भाजीपाला रोपांचे उन्हापासून संरक्षण होत आहे. उन्हाळ्यातील तापमान लक्षात घेता आता अनेक शेतकरी क्रॉप कव्हरचा वापर शेतीत करू लागले आहेत. याचे महत्त्व शेतकऱ्यांना कळू लागले आहे. शासनाकडूनही क्रॉप कव्हरसाठी अनुदानही मिळत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात प्रामुख्याने धानाचे पीक तसेच अन्य पीकही घेतल्या जाते. गेल्या पाच-सहा वर्षापासून धान शेतीला जोड म्हणून रबी हंगामात सिंचन सुविधा असणारे शेतकरी भाजीपाला पिकाची लागवड करतात. तप्त उन्हात या पिकांची काळजी घ्यावी लागते.

संरक्षणासाठी उपाययोजनाजिल्ह्यात उन्हाळा तापदायक असतो. त्यात भाजीपाला पिकांची लागवड मार्च ते मे या महिन्यांत केली, तर उन्हामुळे पिकांचे नुकसान होतच असते. त्यामुळे भाजीपाला पिकांची लागवड करत असताना, उन्हापासून भाजीपाला रोपांचे संरक्षण व्हावे, यासाठी क्रॉप कव्हरचा वापर केला जातो. यामुळे फळ व भाजीपाला पिकांच्या रोपांचे संरक्षण होते. त्यामुळे शेतकरी अधिकाधिक वापर करीत आहेत.

**चांगल्या दरासाठी उत्पादक शेतकऱ्यांची धडपड**


उन्हाळ्यात आणि जून-जुलै महिन्यामध्ये भाजीपाला पिकांची लागवड केल्यास बाजारात चांगला दर मिळतो. हा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. याच महिन्यात लग्नसराई असते. त्यामुळे अनेक शेतकरी एप्रिल ते जुलै या महिन्यात उत्पादन मिळेल, या अंदाजाने पिकांची लागवड करीत असतात. दर चांगले मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो. त्यामुळे उन्हाळ्यात अनेक शेतकरी आपल्या शेतात भाजीपाला पिकाची लागवड करताना दिसतात.

# जिल्हा परिषदमध्ये 'बॅक डेट' शिक्षक भरती घोटाळा

## आजी, माजी मंत्री योजनेचे लाभार्थी, अमरावती शिक्षण विभागात निरव शांतता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

बॅक डेट 'मध्ये शिक्षक भरती घोटाळ्याचे लोन आता राज्यभर पसरले असून, अमरावती विभाग, तसेच पुणेचे शिक्षण संचालनालय, उपसंचालक, वेतन अधीक्षक, मंत्रालय यांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. त्यामुळे 'एकमेका साहाय्य करू' आतमधून 'अर्थ'पूर्ण हालचालींचा वेग वाढला आहे. वर वर शांत दिसणाऱ्या शिक्षण विभागात वेगवान हालचाली सुरू आहेत. एका मोठ्या पदाधिकाऱ्यांच्या घरी बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. तत्कालीन शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी या संकटातून म्हणजेच घाण 'टाक्या'तून बाहेर पडण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी चालविली आहे.





अमरावती शिक्षण विभागात शिक्षक भरती घोटाळा या आलेल्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे, माहिती अधिकार व जुने अधिकारी यांच्यावर दोषारोप करू नयेत, तसेच आपले पितळ उघडे पडणार नाही, याची जवाबदारी सर्व माध्यमिक आणि प्राथमिक अधिकारी घेत आहे. दुसरीकडे आयएएस अधिकारी यात गुरफटले गेल्यामुळे संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषद सीईओ मात्र सावध भूमिका घेत आहे. आजी, माजी मंत्री हे या योजनेचे लाभार्थी असल्यामुळे सभागृहात त्यांनी मौन धारण केले होते. त्यामुळे खोलात कुणी जायला तयार नाही. अद्यापही शिक्षण विभाग किंवा तपास यंत्रणेकडून कोणतीही कार्यवाही नाही अथवा अद्यापपर्यंत कोणतेही चौकशीचे पत्र आले नसल्याचे झेडपी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.

**अमरावती झेडपीत 'पहिले छोकरी फिर नोकरी'**

२०१२ नंतर जेव्हा नोकरीकरिता स्पर्धा परीक्षेत बेरोजगार धडपडत होते. नियमित परीक्षा देऊन आपले नशीब आजमावत असताना पडद्यामागून मात्र दुसरीकडे अमरावती जिल्हा परिषदमध्ये ज्यांच्याकडे थेट नोकरीची लिंक होती, ते 'पहिले छोकरी फिर नोकरी' एक वेळा मुलगी पसंत पडली की, सरकारी नोकरी लावून देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेतील 'गोल्डन गँग' ग्यारंटी घेत होती. यांच्या घरात व जवळच्या सर्व सहकारी यांचे पती-पत्नी नोकरीवर 'डबल इंजिन' अविरत चालू आहे. यातील बहुतेक घोटाळे शिक्षक भरती व दुसरे आरोग्यसेवक भरतीमध्ये झाले आहे.

**अल्पसंख्याक शाळा मान्यता देणारा 'दिनेश' कोण?**

अमरावती शिक्षण विभागाचा लाडका दिनेश याने बडनेरा मार्गावरील एक नामांकित हायस्कूल यासह चांदूरबाजार तालुक्यात हिरुळपूर्णा येथील संस्था विकत घेतली, तसेच शिराळा, शिरसगाव कसबा येथील शाळेतही बोगस शिक्षक नेमणूक करण्यात 'दिनेश' याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे, तसेच जिल्ह्यात शाळांना अल्पसंख्यांक शाळेचा दर्जा मिळवून देण्यासाठीही अमरावतीच्या शिक्षक विभागात मोठा आर्थिक 'गेम' झाला आहे. तत्कालीन शिक्षणाधिकारी माध्यमिक यांची कसून चौकशी केल्यास शिक्षण भरती वा शाळांना अल्पसंख्याक शाळा मान्यता असे अनेक धक्कादायक प्रकार बाहेर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या शिक्षक घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी वाढली आहे.




# परवानगी नाही; तरीही डीजेचा आवाज वाढतोच कसा साहेब ?सूचनांचे पालन करा; तक्रार केल्यास होणार कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

डीजे वाजवण्यासाठी पोलिसांकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु, काहीजण परवानगी न घेता डीजेचा वापर लग्न व इतर समारंभात करू पाहत आहेत. त्यामुळे आजारी व्यक्ती, वयोवृद्ध, हृदयरुग्ण व लहान मुलांना कर्णकर्कश आवाजाचा त्रास होतो आहे. अशावेळी कोणीही तक्रार केली, आयोजकांविरुद्ध कारवाई केली जाऊ शकते, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. तर लग्न समारंभ, सण, उत्सव व इतर जयंती कार्यक्रमांत डीजे वाजवण्यासाठी पोलिसांकडून परवानगी घेणे आवश्यक आहे, तसेच डीजेचा आवाज किती आसावा, यावरदेखील मर्यादा आहे. परंतु, मर्यादेपेक्षा अधिकचा आवाज केला जात आहे. दुसरे म्हणजे परवानगी घेतली तरी रात्री १०वाजल्यानंतर डीजे वाजवणे हे कायद्याला धरून नाही. डीजेसंदर्भात कोणी तक्रार केली तर तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेऊन आयोजकांविरुद्ध कारवाई होऊ शकते. वेळप्रसंगी गुन्हाही दाखल होऊ शकतो, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. डीजेचा आवाज निर्धारित ध्वनी पातळीपेक्षा जास्त असल्यास त्याचा वापर करण्यास परवानगी मिळू शकत नाही. विशेष म्हणजे शांतता क्षेत्र, रुग्णालय, शाळा, महाविद्यालय, प्रार्थनास्थळे आदीठिकाणी डीजे वाजवण्यासाठी परवानगी नाही. परंतु, काही दिवसांपासून या नियमाला बगल दिली जात असून, कोणत्याही वेळी डीजेचा कर्णकर्कश आवाज कानी पडू लागला आहे. शहरात तर रुग्णालयाच्या परिसरात डीजे बिनधास्त वाजवला जात आहे. त्यामुळे आजारी व्यक्तींना त्रास सहन करावा लागत आहे.

# 'एचटीबीटी' बियाण्यांच्या विक्रीत चार राज्यांतील दलालांचे कनेक्शन

## शासनाची मान्यता नाही : तेलंगणा, आंध्र, गुजरात, मध्य प्रदेशच्या सीमा भागात सक्रिय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

महिनाभरावर आलेल्या खरीप हंगामाची तयारी शेतकऱ्यांसह कृषी विभाग करीत आहे. याच दरम्यान शासनाची मान्यता नसलेल्या एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीसाठी तेलंगणा, गुजरात, आंध्र प्रदेश व मध्य प्रदेशातील दलाल जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सक्रिय झाल्याची माहिती आहे. कृषी विभागाद्वारा बोगस बियाण्यांच्या कारवाईत या राज्याचे कनेक्शन समोर आलेले आहे.

अमरावती जिल्ह्यात धामणगाव, यवतमाळमधील बाभुळगाव व वर्धा जिल्ह्यातील पुलगाव या तीन जिल्हा सीमांच्या ट्रॅंगलमध्ये शिवाय मध्य प्रदेश सीमेलगत वरुड तालुक्यात दरवर्षी एचटीबीटी बियाण्यांची विक्री होते. याच भागात सातत्याने कृषी विभागाच्या कारवाया होत आहे. कपाशीसाठी शेतकऱ्यांना केंद्र शासन मान्यताप्राप्त बीजी-१ व बीजी-२ या वाणाची लागवड करता येईल. बीजी-३ म्हणजेच एचटीबीटी या वाणाचा वापर केल्यास पर्यावरण कायद्याने गुन्हा ठरणार आहे. त्यासाठी ५ वर्षे कारावास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद आहे.कृषी विभागाद्वारा १५ पथकांचे गठन करण्यात आले असून तपासणीच्या कामी लागला आहे. शेतकऱ्यांनी शासनाची मान्यता नसलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या कापूस बियाण्याची खरेदी कोणत्याही अनधिकृत विक्रेत्याकडून करू नये. शासनमान्यता नसलेल्या एचटीबीटी किंवा कोणत्याही प्रकारच्या बियाण्यांची खरेदी करताना शेतकऱ्यांची फसवणूक होऊन पर्यावरणाचे नुकसान होते. त्यामुळे पर्यावरण कायद्यांतर्गत अशा बियाण्यांचा वापर हा कायद्यानुसार गुन्हा ठरविण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी दिली.

**पूर्वहंगामी कपाशीची लागवड टाळा**

बियाणे पाकीट सीलबंद, मोहोरबंद असल्याची खात्री करूनच खरेदी करावी, बियाणांच्या उगवणीची खात्रीसाठी पाकिटावरील अंतिम मुदत तपासावी.

बीजी-२ तंत्रज्ञान सर्व वाणांमध्ये सारखेच असल्याने एका विशिष्ट वाणाची मागणी टाळावी. १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय करू नये. पूर्वहंगामी कपाशी लागवड पूर्णतः टाळण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

